# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## गुरुवार, दिनांक १० जुलै, २०२५

## (सकाळी १०.०० ते ११.०० वाजता)

**(क) : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये**

**(गुरुवार, दिनांक ३ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) [अनुक्रमांक १ व २]**

(१) **सर्वश्री विक्रम काळे, सतिश चव्हाण, किरण सरनाईक, वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"भोकरदन तालुक्यातील (जि.जालना) वीर छत्रपती सुशिक्षित बेरोजगार सहकारी संस्थेने सोयाबीन खरेदी करुन आर्थिक गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आलेले असणे, त्याबाबत सदर संस्थेचे अध्यक्ष, सचिव व संचालक यांनी सदर गैरव्यवहार केल्याचे प्राथमिक चौकशीत निदर्शनास आलेले असणे, शेतकऱ्यांनी केलेल्या तक्रारीनुसार त्यांचे ७/१२, पासबुक, खाते उतारे व पीक पेऱ्याची पडताळणी यामध्ये विसंगती असल्याने संबंधितांविरुध कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

(२) **सर्वश्री सुनिल शिंदे, अंबादास दानवे, ॲड.अनिल परब, वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून विविध प्रकल्प हाती घेण्यात येत असल्यामुळे प्रकल्पबाधितांच्या संख्यांमध्ये वाढ होणे, परंतु प्रकल्पग्रस्तांसाठीच्या सदनिकांची मागणी आणि प्रत्यक्ष पुरवठा यांत कमालीची तफावत असल्याने प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचा प्रश्न बृहन्मुंबई महानगरपालिकेपुढे उभा असणे, सन २०१९ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेला ३५,००० सदनिकांची गरज असणे, सन २०२३ मध्ये यामध्ये वाढ होवून हा आकडा ७४,७५२ सदनिकांपर्यंत गेला असणे, सदर तुलनेत गत सात वर्षांत बृहन्मुंबई महानगरपालिकेला शासकीय प्राधिकरणाकडून केवळ २,११३ पुनर्वसन सदनिका प्राप्त झाल्या असून बृहन्मुंबई महानगरपालिकेने स्वत:चे भूखंड विकसित करून ३,०११ नवीन पुनर्वसन सदनिका बांधल्या असणे, प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनात होत असलेल्या विलंबामुळे प्रकल्पाच्या खर्चाच्या किंमतीत वाढ होणे, यास्तव बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्रकल्पबाधितांसाठीच्या सदनिकांची संख्या वाढविण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

अग्रिम प्रत

**(सोमवार, दिनांक ७ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) [अनुक्रमांक ३ व ४]**

**(३)** **सर्वश्री दादाराव केचे, प्रविण दरेकर, श्रीमती चित्रा वाघ, वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"आर्वी व आष्टी तालुक्यातील मौजे अंतोरा, जोलवाडी, देलवाडी, अंबिकापुर (जि.वर्धा) येथील रस्ता बांधकामाकरीता भूसंपादनाची प्रकरणे विशेष भूसंपादन अधिकारी यांचेकडे सादर करण्यात आलेली असणे, उपजिल्हाधिकारी, भूसंपादन, वर्धा यांनी दिनांक २५ सप्टेंबर, २०१७ रोजी भूसंपादनाचे प्रस्ताव परत करून शासन निर्णयानुसार खाजगी वाटाघाटी प्रकरणे सुधारित प्रस्तावात सादर करण्याचे निर्देश प्राप्त होणे, त्यानुसार सुधारीत मूल्यांकन मोबदल्याची रुपये १० कोटी ६ लक्ष २९ हजार ५०२ इतकी रक्कम असणे, याकरिता जिल्हास्तरीय मोबदला निश्चिती समितीने मान्यता दिलेल्या मूल्यांकनानुसार लेखाशिर्ष ३०५४/२४९९ ग्रामीण भाग व पूल रस्ते दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

**(४)** **सर्वश्री जगन्नाथ अभ्यंकर, किरण सरनाईक, ज्ञानेश्वर म्हात्रे, वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"राज्य शासनाने अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील रिक्त मंजूर पदे भरण्यावर दिनांक २ मे, २०२२ पासून बंदी घातली असून, अल्पसंख्यांक संस्थांमधील रिक्त पदे भरण्यावरसुद्धा बंदी घातली गेली असणे, दिनांक २० जून,२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये नियुक्तीवरील बंदी तात्पुरत्या कालावधीकरीता उठविण्यात आली असणे, तसेच अल्पसंख्यांक संस्थांवरील पदे भरण्याबाबत घातलेली बंदी दिनांक १३ जुलै, २०१६ रोजीच्या शासन आदेशान्वये उठविण्यात आली असणे आणि दिनांक ४ मे, २०२० रोजीच्या शासन आदेशान्वये पुन्हा बंदी घातली जाणे , अशा प्रकारे साधारणत: १० - ११ वर्षे अनुदानित शाळांतील शिक्षक आणि शिक्षकेतरांची हजारो पदे रिक्त राहिल्याने उच्च शिक्षित पात्र उमेदवार नोकरीपासून वंचित असणे, शासन निर्णय दिनांक ७ फेब्रुवारी, २०१९ नुसार बिगर अल्पसंख्यांक संस्थेच्या अनुदानित शाळांतील रिक्त जागा पोर्टलद्वारे भरण्याचे शासनाने आदेश देण्यात आले असणे, महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवाशर्ती) नियमावली १९८१ मधील नियम ९ (४) मध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकांची आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करतांना उमेदवाराचे वय नियुक्तीच्या वेळी १८ वर्षापेक्षा कमी असता कामा नये

अप्रकाशित प्रत

एवढाच उल्लेख असणे, सदर नियमावली मध्ये कमाल वयोमर्यादा नमूद केलेली नसणे, नियमावलीतील सदर तरतूदी दुर्लक्षुन दिनांक ७ फेब्रुवारी, २०१९ रोजीच्या शासन निर्णयामध्ये कमाल वयोमर्यादा दर्शविली असणे व मागील १०-११ वर्षे रिक्त पदांची भरती बंद असल्यामुळे १० वर्षांपूर्वी डी.एड, बी.एड ही अध्यापन शास्त्रातील अर्हताप्राप्त तरुण - तरुणींचे वयोमर्यादा ओलांडल्याने शिक्षक होण्याचे स्वप्न दुरापास्त होणे, त्यामुळे शिक्षकांची रिक्त पदे भरण्यावर घातलेली बंदी आणि महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी सेवाशर्ती नियमावली, १९८१ मधील नियम ९ (४) मधील तरतूद यांचा साकल्याने विचार करून शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

**(मंगळवार, दिनांक ८ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) [अनुक्रमांक ५ व ६]**

(५) **सर्वश्री सत्यजित तांबे, किशोर दराडे, विक्रम काळे, वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"**पुणे ते नाशिक या शहरांदरम्यानच्या औद्योगिक महामार्गाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत**" या विषयावरील **श्री.सत्यजित तांबे, वि.प.स.** यांचा तारांकित प्रश्न क्रमांक **३८** ला दिनांक ११ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

(६) **सर्वश्री विक्रम काळे, सतिश चव्हाण, किरण सरनाईक, वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"**राज्य शासनाच्या विभागांतील विविध संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत**" या विषयावरील **श्री. विक्रम काळे व इतर वि.प.स.** यांचा तारांकित प्रश्न क्रमांक **१** ला दिनांक ४ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**(बुधवार, दिनांक ९ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) [अनुक्रमांक ७ व ८]**

(७) **श्री. सदाशिव खोत, डॉ. परिणय फुके, ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीवर संचालक मंडळ नियुक्त झाल्यावर

अमुद्रित प्रत

अनेक गैरव्यवहार होणे, यामध्ये अनधिकृत बांधकामे, सुरक्षा एजन्सींची नियुक्ती, वाहनतळाचे ठेके, विविध निविदा, सेस चोरी प्रकरणे आदी विविध गैरव्यवहारांमुळे बाजार समिती सातत्याने चर्चेत येणे, सदर प्रकरणाची गंभीर दखल घेऊन शासनाने तात्काळ संचालकांवर कारवाई करणे, यापूर्वी पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या गैरव्यवहाराबाबत केलेल्या चौकशीचा अहवाल सादर करण्यात आलेला नसणे, सदर प्रकरणी मा.मंत्री महोदयांनी चौकशीचे आदेश देऊन देखील चौकशी पूर्ण होत नसल्याची गंभीर बाब समोर येणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

(८) **डॉ. परिणय फुके, श्री. प्रविण दरेकर, ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"जलसंपदा विभागातील 'सिंचन सहायक' पद निर्मिती करण्यासाठी उच्चस्तरीय अभ्यास गटाची नियुक्ती करण्यात आली असणे, सदर उच्चस्तरीय समितीने उक्त पदासाठी वेतनश्रेणी रु. ५२००-२०२०० व ग्रेड पे २४०० बाबत शिफारस केलेली असणे, वित्त विभागाच्या शासन निर्णयातील जोडपत्र "अ" मुद्दा क्र.२ नुसार जबाबदा-या आणि कर्तव्यात अल्प प्रमाणात फरक आहे आणि त्या पदाचे कर्तव्य व जबाबदाऱ्यां यांचा विचार करुन प्रसंगी काही संवर्ग एकत्रिकरण करण्याचा विचार करावा, असे करतांना काही विशिष्ट पदाची आवश्यकता असल्यास अतिरिक्त वेतन देण्याचे प्रस्तावित करुन अधिक जबाबदारीचे काम त्यांच्याकडे सुपूर्द करावे असा स्पष्ट उल्लेख असणे, त्यानूसार तत्कालीन मा. सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग यांनी सिंचन व्यवस्थापनातील गुंतागुंत कमी होणार असल्याने सदर मागणीचा प्रस्ताव फाईल क्र.३६० आ/आतांत्रिक अन्वये वित्त विभाग व सामान्य प्रशासन विभागाकडे मंजुरीकरिता पाठविण्यात आला असणे, मंत्री जलसंपदा व लाभक्षेत्र विकास यांच्या दालनात संपन्न झालेल्या बैठकीत 'सिंचन सहायक' पदास वेतनश्रेणी रु.५२०० - २०२०० व ग्रेड पे २४०० देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला असूनही, अद्यापपर्यंत 'सिंचन सहायक' पदनिर्मिती व वेतन त्रुटीतील अन्याय दुर झालेला नसणे, त्यामुळे 'सिंचन सहायक' या पदाची निर्मिती करुन उक्त पदास वेतनश्रेणी रु. ५२०० - २०२०० व ग्रेड पे २४०० लागू करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

## (सकाळी ११.०० ते ११.४५ वाजता)

**(ख)    : (मंगळवार, दिनांक ८ जुलै, २०२५  व बुधवार, दिनांक ९ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव)** —

**सर्वश्री सदाशिव खोत,** हेमंत पाटील, विक्रम काळे, प्रविण दरेकर, डॉ. मनिषा कायंदे, सर्वश्री अमोल मिटकरी, प्रसाद लाड, श्रीमती भावना गवळी, श्री संजय खोडके, ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री कृपाल तुमाने, इद्रिस नायकवडी, श्रीकांत भारतीय, किशोर दराडे, पंकज भुजबळ, श्रीमती चित्रा किशोर वाघ, सर्वश्री चंद्रकांत रघुवंशी, किरण सरनाईक, डॉ. परिणय फुके, सर्वश्री संदीप जोशी, दादाराव केचे, संजय केणेकर, योगेश टिळेकर, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री विक्रांत पाटील, अमित गोरखे, वसंत खंडेलवाल, ज्ञानेश्वर म्हात्रे, रणजितसिंह मोहिते-पाटील, धर्मगुरू राठोड, राजहंस सिंह, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव --**

"राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्र केंद्रस्थानी ठेऊन सिंचन क्षेत्राकडे विशेष लक्ष देण्याचा शासनाचा प्रयत्न असणे, कृषी क्षेत्रात कृत्रिम बुध्दिमता (ए-आय) तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे धोरण अंमलात आले असणे, जलयुक्त शिवार योजना, नदीजोड प्रकल्प आणि रखडलेल्या सिंचन योजनांच्या माध्यमातून कृषी सिंचन वाढविण्यावर भर देण्यात आला असणे, विदर्भातील वैनगंगा-पैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प पूर्ण झाल्यास १० लाख एकर जमिन ओलिताखाली येण्याची शक्यता असणे, नार-पार-गिरणा नदीजोड प्रकल्पामुळे नाशिक व जळगाव जिल्हयातील ४९,५१६ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ होणार असणे, दमणगंगा-एकदरे-गोदावरी या २३०० कोटी रुपये किंमतीच्या नदीजोड प्रकल्पामुळे ३.५५ टीएमसी पाणी उपलब्ध होणार असणे, तापी महापुनर्भरण या १९,३०० कोटी रुपये किंमतीच्या सिंचन प्रकल्पामुळे उत्तर महाराष्ट्र  आणि पश्चिम विदर्भातील खारपाण पट्ट्यातील शेतकऱ्यांना लाभ होणार असणे, महाकृषी विकास अभियान अंतर्गत केवळ १ रुपयात राबविण्यात येणाऱ्या पिक विमा योजनेत नियमितता ठेवण्याच्या दृष्टीने कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी अधिक सतर्क होण्याची आवश्यकता, अटल भूजल योजना अधिक गतीमान करण्याची आवश्यकता, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा-२ ला मंत्रीमंडळाची मान्यता मिळणे, कोकणातील उल्हास आणि वैतरणा नद्यांच्या खोऱ्यातून ५४.७० टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याचा प्रकल्प प्रस्तावित असणे, राज्यात शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्वाचे पांदण रस्ते तातडीने पूर्ण करण्याकरिता "मातोश्री पांदण रस्ते योजना" अधिक सुटसुटीत करुन राबविण्याची आवश्यकता, राज्यात सन २०२४-२०२५ च्या हंगामांतर्गत सोयाबीन, तूर, ज्वारी, चना, कापूस इत्यादी धान खरेदी झाली

अमुद्रित प्रत

असणे, शासकीय खरेदी योजनेतील अनियमितता टाळण्यासाठी योजना सक्षम करण्याची आवश्यकता, राज्यात काही गावांतील शेतकऱ्यांना डिजिटल पध्दतीने देण्यात येणारे लाभ मिळण्यात असलेल्या अडचणी दूर करण्याची आवश्यकता, "मॅगनेट २.०" अंतर्गत कृषी व्यवसायाला चालना देण्यासाठी विशेष योजना हाती घेण्यात आली असणे, ऊर्जा वापराला प्रोत्साहन देतानाच ऊर्जा निर्मितीवर भर देण्यात येत असणे, १६००० मेगावॅट क्षमतेच्या सौरऊर्जा प्रकल्पांना गती देण्याचे धोरण आखण्यात येणे जेणेकरुन, शाश्वत व स्वच्छ ऊर्जा मिळेल आणि औद्योगिक क्षेत्राला त्याचा फायदा होईल, राज्यातील सर्व शासकीय इमारती सन २०२५ या वर्षाच्या अखेरपर्यंत संपूर्णपणे सौरऊर्जेद्वारे विद्युतीकरण करण्याचे धोरण असणे, शेतकऱ्यांना सिंचनासाठी सौर कृषीपंप उपलब्ध करुन देणारी "मुख्यमंत्री सौर कृषी योजना" राज्यात प्रभावीपणे राबविण्यात येत असणे, सौर ऊर्जेचा वापर वाढवून शाश्वत शेतीला प्रोत्साहन देण्याचे शासनाचे उद्दिष्ट असणे, महाराष्ट्र देशासाठी रोल मॉडेल व्हावे व राज्यातील शेतकरी सुजलाम-सुफलाम व्हावा यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे —**

(क) **तारांकित प्रश्न**

(ख) **अतारांकित प्रश्नोत्तराची पहिली ते नववी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

(१) **मुख्यमंत्री** :

**(क)** "महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (महानिर्मिती) यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वार्षिक लेखा अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(२) **उप मुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री** : "शहर व औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित (सिडको) यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा बावन्नावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

अमुद्रित प्रत

**(३) उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** :

**(क)** "मुंबई विद्यापीठ यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वाार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** "संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा एक्केचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(घ)** "श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वार्षिक अहवाल "सभागृहासमोर ठेवतील.

**(ङ.)** "डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा सदुसष्टावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(च)** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ ( सन २०१७ चा महा ६ ) यांचा कलम ३ (६) (ख) (चार) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारानुसार "वारणा विद्यापीठ, वारणानगर, कोल्हापूर" या समूह विद्यापीठची स्थापना करण्याबाबतची प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक संकीर्ण-२०२४/ प्र.क्र.३६/ विशि-४, दिनांक १५ मे, २०२५ सभागृहासमोर ठेवतील.

**(४) माजी सैनिक कल्याण मंत्री** : "महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा सतरावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

असुधारित प्रत

**तीन : अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे.**

**चार : विनंती अर्ज सादर करणे –**

**श्री. धीरज लिंगाडे, वि.प.स.** : "बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील अंधेरी के-वेस्ट येथील मोगरा नाला बंदिस्त केल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना होत असलेल्या त्रासाबाबत उपाययोजना करण्याबाबत" या विषयावरील विनंती अर्ज सभागृहाला सादर करतील.

**पाच : (क) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना – (असल्यास)**

**(ख) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने –**

**(मंगळवार, दिनांक ८ जुलै, २०२५ व बुधवार, दिनांक ९ जुलै, २०२५ रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेले प्रलंबित म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदन) (अनुक्रमांक १ ):-**

(१) **श्री.शशिकांत शिंदे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १ वर परिवहन मंत्री निवेदन करतील :-**

"ई-चलन कार्यप्रणालीमार्फत होत असलेल्या अन्यायकारक दंडात्मक कारवाई विरुद्ध राज्यातील वाहतूकदारांनी व शालेय बस संघटनांनी त्यांच्यावर होत असलेल्या अकारण कारवाई विरुद्ध संप करण्याचा घेतलेला निर्णय."

**(बुधवार, दिनांक ९ जुलै, २०२५ रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने) (अनुक्रमांक २ ते ५ ) :-**

(२) **श्री.सुनिल शिंदे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ५ वर उप मुख्यमंत्री निवेदन करतील :-**

"पश्चिम रेल्वे आणि मध्य रेल्वे मार्गावरील परळ रेल्वे स्थानकावर महत्त्वाचा असा १२५ वर्षे जुना ब्रिटीशकालीन एल्फिस्टन उड्डाणपूल लवकरच पाडण्यात येणार असल्याने दक्षिण मुंबईतील वाहतूक कोंडी अजून वाढण्याची निर्माण झालेली परिस्थिती."

अग्रिम प्रत

(३) **श्री.अंबादास दानवे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ८ वर आदिवासी विकास मंत्री निवेदन करतील :-**

"नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी गायी वाटप प्रकल्पातील गैरव्यवहाराची चौकशी करून कारवाई करण्याबाबत."

(४) **श्री.सचिन अहिर, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ४ वर सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री निवेदन करतील :-**

"चाकण (पुणे) येथील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्याकरिता शासनाने गांभीर्याने लक्ष घालून त्याठिकाणी सहा पदरी रस्ता व उड्डाण पुल बांधण्याबाबतचा निर्णय घेण्याबाबत."

(५) **श्री.शशिकांत शिंदे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ७ वर सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री निवेदन करतील :-**

"सातारा - लोणंद मार्गावर (जि.सातारा) लहान मोठे खड्डे पडलेले असल्यामुळे दररोज मोठ्या प्रमाणात अपघात होत असल्याबाबत."

(६) **श्री.अंबादास दानवे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ११ वर उप मुख्यमंत्री (नगरविकास) निवेदन करतील :-**

"छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेमार्फत दिनांक ३० जून २०२५ रोजी पैठण रोड परिसरात, विशेषतः कांचनवाडी, नक्षत्रवाडी व चिकलठाणा या गावठाणांमध्ये “सर्व्हिस रोड”च्या नावाखाली मालकी हक्काने वास्तव्यास असलेल्या गरीब नागरिकांची घरे व दुकाने कोणत्याही वैध नोटीस, पंचनामे किंवा कायदेशीर प्रक्रिया न राबवता बेकायदेशीररित्या पाडण्यात आल्याबाबत."

(७) **श्री.शशिकांत शिंदे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १३ वर उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) निवेदन करतील :-**

कार्यकारी अभियंता, पूर्व मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळातील दलालांकडून सुशिक्षित बेरोजगार अभियंता लॉटरी व इंटेंडरिंग च्या योजनेमध्ये मोठ्या प्रमाणात संगनमताने भ्रष्टाचार केल्याप्रकरणी.

अग्रिम प्रत

**(८) श्री.सत्यजीत तांबे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १० वर उप मुख्यमंत्री (नियोजन) निवेदन करतील :-**

"महाराष्ट्रातील विदर्भ, मराठवाडा व इतर भागांसाठी स्थापन करण्यात आलेल्या वैधानिक विकास मंडळांची पाच वर्षांची मुदत दिनांक ३० एप्रिल, २०२० रोजी संपुष्टात आलेली आहे व मागील पाच वर्षे कोणतेच मंडळ कार्यरत नाही."

**(९) ॲड.अनिल परब, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १२ वर उच्च व तंत्रशिक्षण मंत्री निवेदन करतील :-**

"मुंबई विद्यापीठाचे पदवी प्रमाणपत्र छपाई करण्याकरिता देण्यात आलेल्या कंत्राटदारावर कठोर दंडात्मक कारवाई करण्याबाबत."

**सहा : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(१) सर्वश्री पंकज भुजबळ,** शिवाजीराव गर्जे, अमोल मिटकरी, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"संदर्भ.गु.र.क्र.८७/२०२४—डीसीबी सिआडी युनिट—III, मूळ गु.र.क्र.६८२/८/२०२४ भायखळा पोलीस स्टेशन, मुंबई येथे केलेले निवेदन, दिनांक १ मे २०२५, माहे ऑक्टोबर, २०२४ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे भायखळा तालुका अध्यक्ष यांची भायखळा येथे निर्घुण हत्या करण्यात आली असणे, हे प्रकरण अत्यंत संवेदनशील असून त्या संदर्भात सखोल आणि निष्पक्ष तपासाची आवश्यकता असणे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे भायखळा तालुका अध्यक्ष हे एक नि:स्वार्थी समाजसेवक होते, ते भायखळा माझगाव आणि लागून असलेल्या परिसरातील गोरगरीब वंचित नागरिकांसाठी सातत्याने कार्यरत असणे, भायखळा तालुका अध्यक्ष हे आरोग्य, शिक्षण,नागरी समस्याबरोबरच परिसरातील अवैध धंद्याविरोधात जसे की अंमली पदार्थाचा व्यवहार,जुगार, मटका, इत्यादी निर्भयपणे आवाज उठवत असणे, त्यांनी अनेकदा स्थानिक गुन्हेगारी व गैर कृत्याविरुद्ध तक्रारी, निवेदन व प्रसारमाध्यमांद्वारे आंदोलनात्मक भूमिका घेतली असणे, ही निर्भय भूमिका त्यांच्या हत्येमागील मुख्य कारण असल्याची ठाम भावना त्यांच्या कुटुंबीयांची असणे, त्यांच्या पत्नी यांनी सादर केलेल्या निवेदनामध्ये काही प्रमुख व्यक्तींविरुद्ध थेट आरोप केले असणे, सदर प्रकरणात संबंधित संशयितांविरोधात गुन्ह्यात सहभागी असल्याच्या दिशेने पुरावे उपलब्ध असल्याचे निदर्शनास आले असणे, मात्र अद्याप सखोल चौकशी झाली नसणे, नागरिकांमध्ये सखोल चौकशी मागणी असणे, मात्र याबाबत

अप्रकाशित प्रत

शासनाकडून दिरंगाई व दुर्लक्ष होत असणे, त्यामुळे नागरिकांमध्ये संभ्रमाची भावना निर्माण झाली असणे, याप्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(२) **श्री.अंबादास दानवे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका क्षेत्रातील जयविश्वभारती हाऊसिंग सोसायटीच्या रेखांकनात उद्यान असून उद्यानाची देखभाल व दुरुस्ती महानगरपालिकेकडून करण्यात येणे, सदर उद्यान अद्यापही महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यात आलेले नसणे, किड्स प्राईड इंग्रजी शाळेस सदरहू उद्यानातून शाळेसाठी रस्ता आवश्यक असल्याने त्यांनी खंडपिठाकडून स्वतःच्या हक्कात आदेश प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने याचिका दाखल करुन आदेश प्राप्त करुन महानगरपालिकेशी रस्ता बांधण्यासाठी करार देखील करण्यात येणे, उक्त कराराच्या अनुषंगाने त्यांनी रस्त्याचे बांधकाम करण्यासाठी ३५ वर्षापुर्वीच्या झाडांची कत्तल करणे, उद्यानाच्या जागेचे हस्तांतरण केले नसतानाही महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी यांनी शाळेचे व्यवस्थापन यांच्याशी आर्थिक संगनमत करुन मा. न्यायालयाकडे चुकीचे कागदपत्रे सादर करणे, मा.न्यायालयाची दिशाभूल करुन चुकीच्या कागदपत्रांच्या आधारे आदेश प्राप्त करणाऱ्या सदर शाळेच्या व्यवस्थापनाविरुध्द तसेच महानगरपालिकेच्या दोषी अधिकाऱ्यांविरुध्द गुन्हा दाखल करुन रस्त्यासंदर्भात केलेला करार रद्द करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया"

(३) **सर्वश्री राजहंस सिंह,** श्रीमती उमा खापरे, सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"पावसाळ्यापूर्वी नियोजनासाठी दरवर्षी मुंबई महानगरपालिका मार्फत मुंबईतील नाल्यांमधील गाळ उपसा होत असणे, मुंबईतील मिठी नदीच्या गाळ उपशासाठी आणि स्वच्छतेसाठी पालिका दरवर्षी विशेष आर्थिक तरतूद करीत असणे, मागील  वर्षांपासून म्हणजे सन २००५ पासून आतापर्यंत सुमारे २००० कोटींहून अधिकचा निधी या एकाच नदीच्या स्वच्छतेसाठी खर्च करण्यात आलेला असणे, यामध्ये मिठी नदीचा गाळ काढणे, जलपर्णी काढणे आणि इतर कामे समाविष्ट असणे, सदर कामांसाठी करोडो रुपये खर्च करूनही मिठी नदीचे पाणी आणि पात्र स्वच्छ झाल्याचे निदर्शनास न येणे, मिठी नदी गाळ उपसा व स्वच्छता कामामध्ये संबंधित पालिका अधिकारी व कंत्राटदार यांच्या संगनमताने

अप्रकाशित मत

मोठ्या प्रमाणात आर्थिक भ्रष्टाचार झाल्याचे उघडकीस आलेले असणे, याप्रकरणी मुख्यमंत्री महोदयांनी चौकशी समिती नेमली असणे, सदर चौकशी समितीच्या माध्यमातून मिठी नदीतील गाळ, महानगरपालिका व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे संबंधित अधिकारी, कंत्राटदार आणि एकूणच खर्चातील कथित अनियमितता, कामातील विलंब, आर्थिक व्यवहार व इतर संशयास्पद बाबींचा तपास व चौकशी होणे अपेक्षित असणे, तसेच दरवर्षी पावसाळ्यात मिठी नदीला येणाऱ्या पुरातून मुंबईत पाणी भरणे, त्यामुळे पावसाळ्यापूर्वी या नदीतील गाळ काढण्याची कामे चार टप्प्यात हाती घेण्यात आली असतांनाही या विकास कामांत अनधिकृत बांधकामाचा मोठा अडथळा मुंबई महानगरपालिकेसमोर निर्माण झालेला असणे, यातील विकास कामाचा पहिला टप्पा पूर्ण झाला असणे, दुसऱ्या व चौथ्या टप्प्याची कामे सुरु असणे, तिसऱ्या टप्प्यातील विकास कामे अद्यापही सुरु होऊ शकली नसल्याने या कामासाठी सन २०२३ मध्ये निविदा मागविण्यात येणे, कामासाठी असलेला जुना दर निविदापूर्व नियमात असलेल्या अनेक त्रुटींमुळे निविदेस वेळोवेळी मुदतवाढ देण्यात येणे, माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये पुन्हा निविदा मागविण्यात येऊनही त्यास अल्प प्रतिसाद मिळाल्याने निविदा प्रकिया थांबविण्यात येणे, या मिठी नदीच्या पूर नियंत्रण रेषेत झालेल्या अनधिकृत बांधकामाकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, मिठी नदी ही मुंबईतील एकमेव नदी असल्याने तिचे सौंदर्य आणि अस्तित्व टिकविण्याकरीता तसेच दहिसर, पोयसर, वालभट, वाकोला आदी नद्यांबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. ”

(४) **श्री.योगेश टिळेकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"महाराष्ट्र राज्यातील पुणे शहरामध्ये विशेषत: गुरुवार पेठेच्या परिसरामध्ये मोठया प्रमाणात अनधिकृत बांधकामे सुरु असणे, तसेच शासकीय जागेवर काही व्यक्तींकडून अतिक्रमणे करुन निवासी तसेच वाणिज्य प्रयोजनार्थ अनधिकृत बांधकामे केलेली असणे, या अनुषंगाने गुरुवार पेठेतील मिर्झा मस्जिद ट्रस्ट जवळील सि.टी. सर्व्हे नं. ३२२ वर एका व्यक्तीने यांनी अनधिकृतरित्या पत्राशेड उभारुन दुकान सुरु केलेले असणे, रजा शहा मस्जिद व दर्गा ट्रस्ट या संस्थेने सि.टी. सर्व्हे नं- ४३६ या जमिनीवर पुणे महानगरपालिकेची रितसर परवानगी न घेता, निवासी वापराकरिता पक्के बांधकाम केलेले असणे, मिर्झा मस्जिद ट्रस्ट व यांचे भाडेकरु यांनी सि.टी.सर्व्हे नं ३२३ वर बेकायदेशीररित्या व अनधिकृतरित्या वाणिज्य प्रयोजनार्थ बांधकाम केलेले असणे, जकारिया बॅग्ज ह्या दुकानाचे अनधिकृतरित्या बांधकाम सुरु असणे, तसेच सि.टी. सर्व्हे नं २४२ वर परवानगी न घेता जोग दर्गाचे पत्राशेड उभारलेले

अप्रकाशित प्रत

असणे, या अनधिकृत बांधकामांविरुध्द पुणे महानगरपालिकेचे उप अभियंता, बांधकाम विकास विभाग-५ यांनी दिनांक २७ मे, २०२५ रोजी संबंधितांना नोटीस काढलेली असणे, परंतु आजपर्यंत सदर अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे निष्कासित केलेली नसणे, या बांधकामांमुळे वाहतुकीस व रहदारीस अडथळा निर्माण होत असणे, तसेच यामुळे नागरीकांमध्ये असंतोष वाढून, सामाजिक सलोखा धोक्यात आलेला असणे, याबाबत शासनाची भूमिका तसेच उपाययोजना."

**(५)** **सर्वश्री शशिकांत शिंदे, विक्रांत पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"माहे ऑक्टोबर,२०२४ रोजी सिडकोने "माझ्या पसंतीचे सिडकोचे घर" योजना जाहिर करणे, सदर घराकरिता दीड लाख लोकांना रु.२३६ भरुन केलेले रजिस्ट्रेशन, जाहिरातीमध्ये कोणतेही अतिरिक्त शुल्क घेणार नाही असे नमुद केलेले असताना माहे जानेवारी, २०२५ मध्ये सिडकोने नवीन माहितीपुस्तिका जाहिर करुन सर्व नोडच्या घरांच्या किंमती जाहिर करणे, सदरहू किंमती अवास्तव व सर्वसामान्य जनतेला परवडणाऱ्या नसणे, सिडको महामंडळ अध्यक्ष यांनी घराच्या किंमती कमी करण्याचे दिलेले आश्वासन, सदर आश्वासनानुसार केवळ २२,००० लोकांनी पुढील प्रक्रियेसाठी संमती दर्शवून अनामत रक्कम भरुन प्रक्रिया पूर्ण करणे, ज्या लोकांना पुष्टीकरण रक्कम भरली नाही त्यांना सिडकोने लॉटरी प्रक्रियेतून बाद करणे, दिनांक १९ फेब्रुवारी, २०२५ रोजी सोडत, जाहिरातीमध्ये दर्शविलेल्या घरांचे क्षेत्रफळ ३२२ चौ.फूट असताना प्रत्यक्ष ग्राहकांना वाटप करण्यात आलेल्या इरादा पत्रामध्ये २९१.९१ चौ.फूट कमी क्षेत्रफळ देऊन सर्वसामान्य जनतेची केलेली फसवणूक, सिडकोने प्रधानमंत्री आवास घरांची लॉटरी काढून निकषांची केलेली पायमल्ली, शासनाच्या रेडीरेकनच्या किंमती व सिडकोने ठरवलेल्या किंमतीमध्ये मोठी तफावत असणे, सिडकोने ग्राहकांच्या केलेल्या फसवणूकीबाबत सखोल चौकशी करुन घरांच्या किंमती २५ टक्के ते ३० टक्के कमी कराव्यात, ज्या लोकांना पुष्टीकरण रक्कम भरली नाही त्यांना सिडकोने लॉटरी प्रक्रियेतून बाद केले, त्यांना प्रक्रियेत सहभागी करुन घ्यावे व म्हाडा महामंडळाच्या धर्तीवर सर्व बाबींचा विचार करुन ग्राहकांना न्याय देण्याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

**(६)** **सर्वश्री शिवाजीराव गर्जे,** विक्रम काळे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात अनेक शेतकऱ्यांचे शेतातील बांध, रस्ते यावरुन होत असलेले वाद, अनेक शेतकऱ्यांचे शेती क्षेत्र सातबारा उताऱ्यावरील नोंदीपेक्षा कमी आहे

अप्रकाशित प्रत

तर अनेकांचे क्षेत्र नोंदीपेक्षा अधिक असणे, यामुळे शेतकऱ्यांमध्ये बांध व रस्त्यावरुन होत असलेले वाद, परिणामी अनेक शेतकऱ्यांमध्ये भांडण होऊन वाढलेली कायमस्वरुपी दुश्मनी व सुरु असलेल्या कोर्ट कचऱ्या, पोलीस स्टेशनमध्ये दाखल केलेले गुन्हे, यामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रगतीत निर्माण झालेली अडचण लक्षात घेता, शासनाने प्रत्येक शेतकऱ्यांना जेवढे ७/१२ दाखल्यावर नोंदणी केलेले जमिनीचे क्षेत्र आहे ते मोजून देऊन कायमस्वरुपी खुणा व हद्द करुन देण्याची आवश्यकता, याकरिता शासनाने राज्यव्यापी सार्वत्रिक शेत जमीन मोजणी मोहिम राबविण्याकरिता करावयाची आवश्यक ती उपाययोजना व शासनाची भूमिका."

(७) **श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे,** ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मा.वसंतराव नाईक सरकारच्या काळामध्ये दिनांक २७ जानेवारी, १९६७ ला स्थापन झालेली महाराष्ट्र राज्यातील बालभारती एक स्वायत्त संस्था असणे, बालभारती पुणे कार्यालयाची इमारत जवळपास ५५ ते ६० वर्षे जुनी असून तेथे विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सेवा साहित्य उपलब्ध करण्याचे काम चालत असणे, या बिल्डिंगचे बांधकाम चांगले नाही, काही भाग पडले असणे, नवीन इमारतीची आवश्यकता असणे, कारण महाराष्ट्र राज्यातील गोरगरीब विद्यार्थ्यांच्या पाठ्यपुस्तक पुरविण्याचा प्रश्न निर्माण झालेला असणे, सदर इमारत अत्यंत जुनी व नादुरुस्त असून तेथील संगणकीय प्रणाली व साहित्य अत्यंत जुने झाले असणे, नवीन इमारत बांधल्याने त्याचा फायदा महाराष्ट्र राज्यातील शालेय विद्यार्थ्यांसाठी पाठ्यपुस्तके तयार करणे, बालभारतीने तयार केलेली पुस्तके माफक दरामध्ये उपलब्ध असल्याने ती गरीब गरजू विद्यार्थ्यांसाठी सहज उपलब्ध होणे, बालभारती मुळे ग्रामीण आणि शहरी भागातील विद्यार्थ्यांना समान शिक्षणाची संधी उपलब्ध होणे, येथे आधुनिक तंत्रज्ञान आधारित नवीन इमारत उभी करण्याची आवश्यकता व मागणी जनतेकडून होत असणे, यावर शासनाने तात्काळ निर्णय घेऊन आधुनिक तंत्रज्ञान आधारित नवीन इमारत उभारणी करण्याकरीता करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**सात : म.वि.प. नियम १०१ – अ अन्वये विशेष उल्लेख – (असल्यास)**

अप्रकाशित प्रत

**आठ : म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

(१) **सर्वश्री सत्यजीत तांबे,** किशोर दराडे, विक्रम काळे, **वि.प.स. वि.प.स.** यांची **म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

"राज्यात एकीकडे वीज ग्राहकांचे दर टप्प्या-टप्प्याने कमी करण्याबाबत शासनाने अभिनंदनीय पाऊल उचलले असताना औद्योगिक वीज दरात मोठी वाढ केलेली असणे, सिन्नर औद्योगिक वसाहतीमध्ये ३९ वर्षापासून कार्यरत असणाऱ्या 'भगवती स्टील' कंपनीने राज्यातील वाढलेल्या औद्योगिक वीज दरामुळे उत्पादन थांबवले असणे, त्यामुळे ५०० कुटुंबीयांवर उपासमारीचे संकट उभे राहिले असणे, भगवती स्टीलने दोन आठवड्यांत वीज दरात सवलत न दिल्यास संपूर्ण उत्पादन यंत्रणा स्थगित करून कायमस्वरूपी बंद करण्याचा इशारा दिला असणे, नाशिक येथील NIMA संघटनेने वेळोवेळी शासनाकडे निवेदन देऊन वीज दरवाढीस विरोध केला असणे, या दरवाढीमुळे नाशिकमधील उद्योग सुद्धा अडचणीत आलेले असणे, वाढत्या वीज दरांमुळे तसेच वीजदरापोटी मिळणाऱ्या सवलतीतील भेदभावामुळे नाशिक मधील स्टील उद्योगातील ३१ पैकी दोनच उद्योग शिल्लक असणे, महाराष्ट्रातील औद्योगिक वीजदर गुजरात, कर्नाटक, तेलंगणा व तामिळनाडूपेक्षा ४०% अधिक महाग असून, तो ९.४० ते ९.९० रुपये प्रति युनिट एवढा असणे, महावितरणने औद्योगिक वीज दर १० टक्क्याने वाढविल्यामुळे उत्पादन खर्च वाढून इतर राज्यातील उद्योगांबरोबर स्पर्धा करणे अशक्य असल्याने राज्यातील उद्योग बंद पडण्याच्या स्थितीत आलेले असणे, ही बाब औद्योगिक विकासाच्या दृष्टिकोनातून गंभीर असून राज्याच्या वीजदर धोरणाचा तातडीने फेरविचार करणे, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व तातडीने करावायची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **सर्वश्री अमित गोरखे,** सदाशिव खोत, श्रीमती चित्रा वाघ, **वि.प.स.** यांची **म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

"राज्यासह पुणे जिल्ह्यातील पुणे व पिंपरी-चिंचवड शहरात भटक्या कुत्र्यांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला असून गेल्या काही दिवसांत भटक्या श्वानांनी रस्त्यावर चालणाऱ्या नागरिकांचा चावा घेतल्याच्या अनेक प्रकार निदर्शनास येणे, भटक्या श्वानांच्या वाढत्या संख्येवर नियंत्रण आणण्यासाठी महापालिकांकडून प्रयत्न करणे, परंतु केंद्रातून हस्तक्षेपामुळे श्वानांचे निर्बिजीकरण आणि लसीकरणात अडथळे निर्माण होणे, पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिकेतर्फे निर्बिजीकरण आणि रेबीजरोधक लसीकरण करण्यासाठी निविदा काढल्या जाणे, परंतु या निविदा ठरावीक संस्थांनाच मिळाव्या यासाठी आयुक्त व संबंधित अधिकाऱ्यांवर दबाव आणला जाणे, यासंपूर्ण प्रकरणाची सखोल

चौकशी करण्याची नितांत आवश्यकता असणे, भटक्या श्वानांचे वाढलेले प्रमाण नियंत्रणात आणण्याकरीता शासनाने याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३)** **सर्वश्री अंबादास दानवे,** राजेश राठोड, सचिन अहिर, सुनिल शिंदे, डॉ. प्रज्ञा सातव, **वि.प.स.** यांची **म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा** —

"मराठवाड्याच्या विकासासाठी प्रकल्पांची घोषणा करुन शासनाकडून निधी उपलब्ध करुन देण्यात येत नसणे, दिनांक १६ सप्टेंबर, २०२३ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये रुपये ४६००० कोटीच्या निधींच्या कामांची घोषणा होणे, बैठकीमध्ये मराठवाड्यातील विकास कामांसाठी जाहिर करण्यात आलेला निधी शासनाकडे मागणी करुनही उपलब्ध होत नसल्याने मराठवाड्यातील अनेक विकासकामे व प्रकल्प निधीअभावी अपुर्ण अवस्थेत असणे, जलसंपदा विभागास २१ हजार कोटींच्या निधीची घोषणा होऊनही निधी न दिल्याने मराठवाड्यातील प्रकल्प अपुर्ण अवस्थेत असल्यामुळे १ हेक्टर सुध्दा सिंचनामध्ये वाढ न होणे, मराठवाडा वॉटर ग्रीड योजनेसाठी प्रत्यक्षात सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात निधीची तरतूदच नसणे, मराठवाडा वॉटर ग्रीड योजनेमध्ये असलेल्या प्रकल्पांचे काम अपुर्ण असल्याने मराठवाडा जिल्ह्यातील शेतीवर व नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण होऊन मराठवाडयाच्या विकासावर त्याचा परिणाम होणे, छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये मराठवाड्यासाठी महत्वाचे असलेला क्रीडा विद्यापीठ ४६.६० हेक्टरवर उभारण्यास मंजुरी देण्यात येणे, परंतु निधी उपलब्ध करुन न दिल्याने अपूर्ण अवस्थेत असणे, मराठवाड्याच्या विकासामध्ये शेतीचे महत्वाचे योगदान असून हळद पिकासाठी पोषक वातावारण मराठवाड्यात असल्याने मा.बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्राला मंजूरी देण्यात येणे, परंतु सदर प्रकल्प निधीअभावी पूर्ण मराठवाड्यात राबविण्यात आलेला नसणे, मराठवाड्यातील मंजुर करण्यात आलेली विकास कामे व प्रकल्पांना वेळेवर निधी उपलब्ध करुन न दिल्याने प्रकल्पांच्या किंमतीमध्ये सुध्दा वाढ होत असणे, परिणामी शासनाच्या महसूलाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असणे, मंजूर विकास कामांना व प्रकल्पांची अंमलबजावणी घेण्यात येणाऱ्या निर्णयानुसार करण्यात येत नसल्याने मराठवाड्याच्या विकासावर व पायाभूत सुविधांवर त्याचा गंभीर परिणाम होणे, त्यामुळे मराठवाड्यात बेरोजगारीच्या प्रमाणात वाढ होत असून जनतेमध्ये शासनाप्रती असंतोषाची भावना निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**नऊ : शासकीय विधेयके —**

**विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

**(क)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७६ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, सतेज उर्फ बंटी पाटील, शशिकांत शिंदे, सचिन अहिर, एकनाथराव खडसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७६ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ख)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७७ - महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण (सुधारणा) विधेयक, २०२५

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, सतेज उर्फ बंटी पाटील, शशिकांत शिंदे, सचिन अहिर, एकनाथराव खडसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७७ - महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण (सुधारणा) विधेयक, २०२५" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**दहा : सर्वश्री अंबादास दानवे,** सतेज पाटील, एकनाथराव खडसे, ॲड.अनिल दत्तात्रय परब, सर्वश्री अभिजित वंजारी, शशिकांत शिंदे, सचिन अहिर, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुनिल शिंदे, सर्वश्री जयंत आसगावकर, जगन्नाथ अभ्यंकर, डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री धीरज लिंगाडे, राजेश राठोड, सुधाकर अडबाले, अरुण लाड, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव :-**

"राज्यात आदिवासी विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांत गंभीर त्रुटी असणे, आदिवासी आश्रमशाळांमध्ये शिक्षकांची व कर्मचाऱ्यांची मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त असून शिक्षणाचा दर्जा घसरलेला असणे, अनेक आदिवासी पाड्यांमध्ये रस्ते, वीज,

पाणी, आरोग्य व शिक्षणाच्या मूलभूत सुविधा अद्याप उपलब्ध नसणे, निधीअभावी योजनांची गतीने व प्रभावी अंमलबजावणी होत नसणे, अपघातग्रस्त रुग्णांना वेळेवर प्राथमिक उपचार मिळत नसणे, शासकीय रुग्णवाहिका वेळेवर पोहचत नसून अनेक जिल्ह्यांतील रुग्णवाहिका दुरुस्ती अभावी बंद अवस्थेत असणे, त्यामुळे नवजात बालके व माता यांच्या मृत्यूचे प्रमाण वाढले असून रस्त्यावरील प्रसूतीच्या घटनांमध्येही वाढ झालेली असणे, शासकीय रुग्णालयांमध्ये वैद्यकीय अधिकारी, परिचारिका व अन्य कर्मचाऱ्यांची असंख्य पदे रिक्त असणे, अनेक वैद्यकीय अधिकारी ग्रामीण भागात सेवा देण्यास नकार देत असल्याने या भागातील आरोग्य व्यवस्था कोलमडली असणे, जन आरोग्य योजनेंतर्गत अनेक रुग्णालयांनी उपचार नाकारल्याच्या घटना घडत असणे, राज्यातील रक्तपेढ्यांवरील रक्ताच्या कमतरतेमुळे अनेक रुग्णांना मृत्युला सामोरे जावे लागणे, त्यामुळे राज्यातील सर्व रक्तपेढ्यांची तपासणी करुन सदरहू रक्तपेढ्या चोवीस तास चालू ठेवण्याची आवश्यकता, धर्मादाय रुग्णालय राज्याच्या नियमांचे सर्रास उल्लंघन करीत असून गरजू रुग्णांना प्रवेश रद्द, आगाऊ रकमेची मागणी व वचनबध्द सुविधा देण्यास जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणे, वैद्यकीय महाविद्यालयांतील संरचना, कर्मचारी व औषधसाठा यांचा दर्जा अत्यंत निकृष्ट दर्जाचा असणे, कमी कन्टेन्टच्या व बोगस औषधांचा पुरवठा शासकीय रुग्णालयात होत असणे, राज्यात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या भुखंड वाटपामध्ये झालेली अनियमितता, भूखंडांचा वापर उद्योगासाठी होणे आवश्यक असताना निवासी वापराकरिता खाजगी विकासकांना देण्यात येणे, उद्योजकांना आवश्यक सोयी सुविधा देण्यास जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याने अनेक उद्योग इतर राज्यात स्थलांतरीत झालेले असणे, जल जीवन मिशन योजनेंतर्गत झालेल्या कामांमध्ये अनियमितता, निकृष्ट दर्जाचे साहित्य, अपूर्ण पाइपलाइन आणि अपारदर्शक खर्च यामुळे हजारो गावांना आजही सुरक्षित पाणीपुरवठा होत नसणे, राज्याच्या प्रगतीचा पाया असलेल्या तरुण पिढीसाठी रोजगाराच्या संधी कमी होत असून शासकीय विभागातील भरती प्रक्रिया प्रलंबित असल्याने विविध संवर्गातील ३ लाख पदे रिक्त असणे, याबाबत शासनाकडून वेळोवेळी आश्वासने देऊनही रिक्त जागा भरण्यास होत असलेले दुर्लक्ष, त्यातच सरकारने निवृत्त अधिकाऱ्यांना राज्यातील सरकारी विभागात कंत्राटी पध्दतीने नियुक्ती देण्यासाठी योजना सुरु केली असणे, उक्त योजनेस बेरोजगार तरुणांचा असलेला विरोध, या सर्व प्रश्नांकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका".

अग्रिम प्रत

**अकरा : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) —**

(१) **सर्वश्री सुधाकर अडबाले, अशोक जगताप, सतेज पाटील, वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"राज्यात शालेय शिक्षण विभागातर्फे परवानगी देण्यात येणा-या शाळांना अनुदानाच्या निकषानुसार १०० टक्के अनुदान प्राप्त होत असणे, आदिवासी विभागातंर्गत येणा-या शाळांना फक्त वेतन अनुदान देण्यात येणे, सध्या शाळेत

डिजीटल बोर्डाचा वापर, बायोमेट्रीक्स सुविधा, संगणक प्रिंटर, संगणक लॅब, सीसीटीव्ही, भौतिक सोयी सुविधा, इत्यादीसाठी विजेचा मोठ्या प्रमाणावर वापर होत असणे, भरमसाठ दराने येणारी विद्युत देयके शाळांना व्यावसायिक दराने भरावी लागत असणे, तसेच या शाळा भाडेतत्वावरील इमारतीत असल्यास वाजवी भाडे फक्त ७५ टक्के देण्यात येणे, सदर भाडे पूर्ण मिळण्यासाठी शाळांना मोठ्या प्रमाणात आर्थिक निधीची गरज असणे, त्यामुळे शासनाने निर्णय घेवून शालेय शिक्षण विभागाच्या धर्तीवर आदिवासी विभागातंर्गत येणा-या शाळांना वेतन अनुदानासोबत वेतनेतर अनुदान भूतलक्षी प्रभावाने उपलब्ध करुन देण्यात यावे अशी मागणी होत असणे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

(२) **सर्वश्री इद्रिस नायकवडी, विक्रम काळे, अमोल मिटकरी**, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"देशात केवळ ६०,००० लोकसंख्या असलेल्या पारसी समाजातील सुमारे ४०,००० नागरिक मुंबई शहरात वास्तव्यास असणे, या समाजाची लोकसंख्या अल्प असल्यामुळे त्यांच्या खाजगी मालमत्ता बळकाविणे, तसेच अनधिकृतपणे मालमत्तांचा ताबा घेण्याचे प्रकार वारंवार घडत असणे, काही प्रकरणांमध्ये महानगरपालिकेमार्फतही अशा मालमत्तांवर गैरप्रकाराने नोंदी करून या मालमत्ता हस्तगत करण्याचे प्रकार समोर आले असणे, या प्रकारांना आळा घालण्यासाठी आणि पारसी समाजाला सुरक्षिततेची हमी देण्यासाठी उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक असणे, पारसी समाजाची लोकसंख्या सातत्याने घटत असल्याने त्यांच्या सांस्कृतिक, धार्मिक व ऐतिहासिक वारशाचे जतन होणे गरजेचे असणे, या पार्श्वभूमीवर "पारसी प्रिझर्वेशन ॲक्ट" सारखी स्वतंत्र कायदेशीर तरतूद करून पारसी समाजाला सुरक्षितता प्रदान करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ९ जुलै, २०२५

**डॉ. विलास आठवले**
सचिव - ३,
महाराष्ट्र विधानपरिषद

अग्रिम प्रत